# पोलीस अधीक्षक कार्यालय, सांगली

सांगली-मिरज रोड, विश्रामबाग, सांगली- ४१६४१५

फोन - ०२३३ - २६७२६९६

फॅक्स - ०२३३ – २६७२१००

E Mail- dsb.sangli@mahapolice.gov.in


क्रमांकः-जिविशा/ श्रीरामनवमी - बंदी आदेश / 2369 /२०२५ सांगली दि. ४.४.२०२५ ५

**आ दे श**

ज्याअर्थी, सन २०२५ सालातील श्रीराम नवमी उत्सव दि.६.४.२०२५ अखेर सांगली शहरात उत्साहाने साजरा करण्यात येणार आहे. याकरीता सुरक्षिततेच्या दृष्टीने सांगली शहरात **महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३४** लागू करणेबाबत माझी खात्री झालेली आहे.
ज्या कारणांसाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३४ लागू करावयाचे आहे ती कारणे खालीलप्रमाणे.

१) श्री रामनवमी उत्सव काळात राममंदीर परिसरात बहुसंख्य लहान मुले, स्त्रिया, पुरुष गर्दी करीत असतात.
२) सदर वेळी कोणतेही वाहन गर्दीत घुसुन नागरीकांचे जिवितास धोका पोहोचु नये याकरीता.

त्याअर्थी, मी **संदीप घुगे, पोलीस अधीक्षक, सांगली** मला **महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३४** अन्वये प्रदान केलेल्या अधिकारान्वये **दि.६.४.२०२५ रोजी १५.०० वा. ते २२.०० वा. पर्यंत** खालील मार्गावर पोलीस वाहने, ॲम्बुलन्स, फायर बिग्रेड, या वाहनांखेरीज सर्व वाहतूक तात्पुरत्या स्वरूपात खालीलप्रमाणे पर्यायी मार्गाने वळविण्याचे नियोजन केले आहे.

➢ **मनाई आदेश लागू करणेत येणारे रस्ते व ठिकाणे :-**

कॉग्रेस भवन चौक ते राममंदीर चौक जाणारा रस्ता, कर्मवीर चौक ते राममंदीर चौक जाणारा रस्ता, सिव्हील हॉस्पीटल चौक ते राममंदीर चौक जाणारा रस्ता (राममंदीर चौकाकडे येणारे सर्व जोड रस्ते)

➢ **पर्यायी वाहतूक मार्ग**

१) **कॉलेज कॉर्नरकडून येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांसाठी :-** कॉलेज कॉर्नर चौक-आपटा पोलीस चौकी काळी खण - पुष्पराज चौकातून वळण घेवून सिव्हील हॉस्पीटल चौक मार्गे शहरात जाता व येता येईल.
२) **सांगली शहरातून मिरजकडे जाणारे वाहनांसाठी :-** स्टेशन चौक - कॉंग्रेस भवन चौक - आपटा पोलीस चौकी - वाहनतळ - काळीखण - कर्मवीर चौक मार्गे मिरज शहरात जाता व येता येईल.
३) **सांगली शहरातून तासगांव, विटा शहराकडे जाणारे वाहनांसाठी :-** एस.टी स्टॅन्ड - सिव्हील हॉस्पीटल रोड - कर्मवीर चौकातून डावीकडे वळण घेवून काळी खण - आपटा पोलीस चौकी मार्गे तासगांव कडे जाता येता येईल.

सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यास महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

Office of the Supdt. of Police Sangli

(संदीप घुगे)
पोलीस अधीक्षक, सांगली

ठिकाण :- सांगली.
दिनांक :- ५ .४.२०२५

प्रति,

१. मा. मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे महाराष्ट्र राजपत्रकामध्ये आदेश प्रसिध्द करुन प्रती रेकॉर्डकरीता पाठविण्याबाबत..
२. मा. जिल्हाधिकारी, सांगली.
३. मा. आयुक्त, सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका
४. जिल्हा माहिती अधिकारी, सांगली यांना - वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी.
५. संपादक, दै.नवसंदेश, महासत्ता, जनप्रवास, केसरी, पुढारी, सकाळ, तरूणभारत, लोकमत, महाराष्ट्र टाइम्स, ललकार इत्यादी
६. उपविभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग, सांगली व मिरज उपविभाग
७. प्रभारी अधिकारी सांगली शहर, मिरज शहर, विश्रामबाग, एमआयडीसी, सायबर पो.ठाणे
८. प्रभारी अधिकारी वाहतूक नियंत्रण शाखा सांगली व मिरज.

Scanned with OKEN Scanner